# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर*

*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.*

*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९*

ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - www.jdteromumbai.com


क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१४/ 1443

दिनांक : 28 MAY 2014

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व अशासकीय विनाअनुदानित,पदवी,
पदव्युत्तर पदवी संस्था
(विभाग अंतर्गत सर्व संस्था)

विषय — शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंबंधी.

संदर्भ :- १. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.यांची अधिसूचना पत्र क्र.२अ/एडीएम/२०१४/९७ दि. १५/०१/२०१४
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.यांची पत्र क्र.२अ/एडीएम /२०१४/२०१४/१७३ दि.२१/०१/२०१४
३. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.यांची पत्र क्र.२अ/एडीएम /२०१४/२०१४/४९९ दि.२४/०२/२०१४
४. या कार्यालयाचे पत्र क्र.४/विकामु/तंशि/तांत्रिक-४/२०१२/६७९ दि.२६/२/२०१४
५. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१४/१०५२ दि.२३ मे २०१४

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ मधील प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस/पीजीडीएम/ एम.फार्मसी, एमसीए प्रथम वर्ष तसेच थेट व्दित्तीय वर्ष स्वतंत्र तुकडी व लॅटरल एन्ट्री पदव्युत्तर पदवी तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा घेऊन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तथापी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल झालेल्या याचिका क्र.८६४६/२०१३ ते ८६५१/२०१३ प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाची पार्श्वभुमी विचारात घेऊन आपल्या संस्थेचा केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्या पुर्वी खालील नमुद कागद पत्राची पडताळणी या कार्यालया मार्फत करण्यात येणार असल्याच्या सुचना संदर्भ क्र. ४ च्या पत्रात देण्यात आल्या होत्या.

तरी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाने सदर्भ क्र. ५ च्या पत्रात दिलेल्या निर्देशानुसार व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्थांना विद्यापीठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घेणे अनिवार्य करण्यात आले असून त्या ज्या संस्थांना अटींच्या अधीन राहुन अथवा तात्पुरते संलग्नीकरण देण्यात आले असल्यास अशा संस्थांचा समावेश केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. **त्या अनुशंगाने आपल्या संस्थेतील अभ्यासक्रम,विद्याशाखा व मंजूर प्रवेश क्षमता या सर्व घटकांना विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पत्रात नमुद केलेल्या वेळापत्रकानुसार दि.२०.०६.२०१४ पर्यत या कार्यालयाकडून पडताळणी करुन घेण्यात यावी. या बाबत कोणताही विलंब झाल्यास त्यास संस्था जबाबदार राहील यांची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.**

सोबत:- संदर्भ क्र. ४ च्या पत्राची प्रत,

(जी.बी.धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत - संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांना माहितीकरिता

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601,22690602,22641150,22641151 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१४/ १०५२

दिनांक : 2 3 MAY 2014

प्रति,

**सहसंचालक,**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना संलग्नीकरण तसेच मान्यतेची माहिती सादर करण्याबाबत.

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक 2अ/एडीएम/2014/173, दिनांक 21.1.2014

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना विद्यापीठांचे संलग्नीकरण प्राप्त करून घेणे अनिवार्य करण्यात आले असून काही संस्थांना अटींच्या अधीन राहून अथवा तात्पुरते संलग्नीकरण देण्यात आल्यास अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही असे संचालनालयाने यापूर्वीच कळविलेले आहे.

सर्व विद्यापीठांना त्यांच्या अधिकारक्षेत्रातील संस्थांना अंशत: अथवा अटी शर्तीच्या अधीन राहून संलग्नीकरणाची मान्यता न देता त्या संस्थांच्या अभ्यासक्रमनिहाय संलग्नीकरण प्रदान करण्यात आलेले आहे किंवा नाही हे स्पष्ट नमूद करण्यात यावे असे संचालनालयाने कळविलेले आहे. तसेच संस्थेला संलग्नीकरणाचे स्पष्ट आदेश असल्याशिवाय संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही असेही विद्यापीठांना कळविण्यात आलेले आहे. सर्व विद्यापीठांना संलग्नीकरणाची प्रक्रिया दिनांक २०.६.२०१४ पर्यंत पूर्ण करण्यात यावी जेणेकरून संबंधित संस्था त्याची माहिती संचालनालयास सादर करतील असेही कळविण्यात आलेले आहे.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्यासाठी संस्थांना व आपल्या कार्यालयाकडून करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| संस्थांकडून अभ्यासक्रम(Course) विद्याशाखा (Branch) व मंजूर प्रवेश क्षमता (Intake) या सर्व घटकांना विद्यापीठाचे संलग्नीकरणाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संस्था User ID आणि Password वापरून अपलोड करणे | आदेश प्राप्त झाल्यापासून दिनांक १५.६.२०१४ पर्यंत |
| संस्थांनी संलग्नीकरणाची माहिती संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर विभागीय कार्यालयाकडून पडताळणी करणे | संस्थांनी अपलोड केल्या पासून दिनांक २०.६.२०१४ पर्यंत |
| संस्थांच्या संलग्नीकरणाची माहिती संकेतस्थळावर प्रमाणित केल्यानंतर ती एकत्रित माहिती विवरणपत्रात भरून संचालनालयास सादर करण्याचा दिनांक | दिनांक २४.६.२०१४ पर्यंत |

आपला,

(डॉ. सुभाष महाजन)

संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\2014-15\Gen Correspondence\Affiliation\letter to BCUD and RO.docx